| | |
|---|---|
| **फौ. किरकोळ अर्ज क्र.१११/२०२६ मधील निशाणी क्रं.१ खालील आदेश.**<br>**(प्रदुमन उमेश होरे विरूध्द महाराष्ट्र सरकार तर्फे पोलिस निरिक्षक, पो.स्टे.औराद शहाजानी)** | MHLA120012562026 |

अर्ज वाचला. तपासी अंमलदार यांनी निशाणी क्र.६ वर दिलेले म्हणणे वाचले. सरकारी विधीज्ञांनी दिलेले म्हणणे वाचले.

२. अर्जदार च्या मालकीचे मारुती सुझूकी कंपनीची ALTO LXIBS IV ज्याचा रजि.न.MH-14-CS-4790, चेसीस नं.MA3EAA61S01796974, इंजिन नं.F8DN45562890 ही गु.रं.नं.८३/२०२६ या गुन्हयाच्या कामी जप्त असून जप्त असून सदर जप्त मुद्देमाल मुळ प्रकरणाच्या चौकशीवेळी आवश्यक असुन सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी तपासिक अंमलदार यांनी म्हणणे दाखल करुन मुद्देमाल सोडण्यास आक्षेप घेतला. सदर अर्जामध्ये इंजिन क्रमांक व्यवस्थीत नसल्याचे नमूद केले आहे. सदरील जप्त मद्देमाल अर्जदारास परत दिल्यास अर्जदार तो पुन्हा अशाच जप्त मुद्देमालाचे आकार, रंगात, रचनेत बदल करण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच सदर मुद्देमाल विक्री करु शकतो असे कथन करीत प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती नि.१ वर केली आहे. तपासी अंमलदार यांनी नि.६ ला म्हणणे दाखल करुन सदर वाहन मालक जप्त वाहन मा. न्यायालयास पाहिजे तेंव्हा हजर करणार नाही तसेच आरोपीस वाहन परत केल्यास सदर वाहन अशाच प्रकारच्या गुन्हयात वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अर्जदार यांना गुन्हयातील जप्त मुद्देमाल परत करण्यात येऊ नये असे कथन केले आहे.

३. अर्जदाराने जप्त मुद्देमाल मारुती सुझूकी कंपनीची ALTO LXIBS IV ज्याचा रजि.न.MH-14-CS-4790, चेसीस नं.MA3EAA61S01796974, इंजिन नं.F8DN45562890 चे नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत, एफ.आय.आर चे सत्यप्रत, विमा पॉलीसी छायांकित प्रत, आणि अर्जदाराचे आधारकार्ड इत्यादी प्रत दाखल केलेले आहेत. सदर कागदपत्रे तपासली, यावरून अर्जदार प्रदुमन उमेश होरे हे जप्त वाहनाचे मालक असल्याचे असुन सदर वाहनाची नोंद आर.टी.ओ. कार्यालयामध्ये अर्जदाराच्या नावावर झाल्याचे दिसुन येते.

४. तपासकामी मुद्देमाल वाहन आवश्यक आहे असे पोलीसांचे म्हणणे नाही. सदर वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याबाबत अभिलेखावर कागदपत्रे दाखल आहेत. तपासी अंमलदार यांनी दिलेले म्हणणे विचारात घेता पोलिस ठाण्यात लावून ठेवण्यासारखी परिस्थिती दिसून येत नाही. सदरचे वाहन खालील अटी व शर्तीवर परत करता येवू शकते. सबब, भारतीय नागरीक सुरक्षा संहीता कलम ५०३ अन्वये मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करणेत येत आहे.

२. पोलिस निरिक्षक पोलीस स्टेशन औराद शहा. यांनी गु.रं.नं.८३/२०२६ या गुन्हयातील मुद्देमाल ALTO LXIBS IV ज्याचा रजि.न.MH-14-CS-4790, चेसीस नं.MA3EAA61S01796974, इंजिन नं.F8DN45562890

अर्जदार प्रदुमन उमेश होरे यांना पुढे नमुद अटींची पुर्तता केलेनंतर परत दयावे.

**अ.** अर्जदारा यांनी न्यायालयात रक्कम रू.५,००,०००/– रूपयेचे क्षतीपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond) दयावे.

**ब.** अर्जदार यांनी त्यांचे ओळखपत्र तसेच त्याच्या रहिवासाचा पुरावा, नोंदणी प्रमाणपत्र याच्या प्रती संबंधीत तपासी अधिकारी यांचेकडे दाखल कराव्यात. सदर बाबत संबंधीत अधिकारी यांनी खात्री करावी.

**क.** सदर मुद्देमाल वाहन न्यायालयाच्या परवानगीशिवाय विक्री वा अन्यप्रकारे विल्हेवाट लावणार नाही तसेच न्यायालयाच्या हुकूमाप्रमाणे आवश्यक तेव्हा सदरचे मुद्देमाल वाहन न्यायालयात हजर करणेची, त्याचप्रमाणे सदरचे वाहन अवैध व्यवसायासाठी वापरणार नसल्याबाबत व सदरचा मुद्देमाल अर्जदाराच्या मालकीचा नसल्याचे निष्पन्न झालेस त्याची किंमत न्यायालयात भरणेस तयार असलेबाबत हमीपत्र संबधीत तपासी अधिकारी यांचेकडे दाखल करावे.

**ड.** संबंधीत तपासी अधिकारी यांनी ताब्यात घेतलेल्या मुद्देमालाचे रंगित छायाचित्र घेवून ते या मुद्देमालाचेच आहे याबाबत खात्री करून घ्यावी व तसा शेरा फोटोच्या मागे नमुद करावा.

**इ.** सदर बाबींची पुर्तता झालेवर संबंधीत अधिकारी यांनी सदरील मुद्देमालाबाबतचा फोटो, पंचनामा तसेच रहिवासी पुरावा आणि ओळखपत्र तसेच वर नमुद हमीपत्र या न्यायालयात दोषारोपपत्रासोबत पाठवावे.

३. या अटी व शर्तींची पुर्तता तसेच कागदपत्रांची योग्य ती पडताळणी झालेनंतरच अर्जदारास मुद्देमाल वाहन परत दयावे.

४. प्रस्तुत आदेशाची एक प्रत आणि अर्जदाराचे क्षतीपूर्ती बंधपत्र सदर गुन्हयातील एफ.आय.आर. सोबत ठेवणेकामी संबंधीताकडे सुपुर्द करावा.

५. सदरचे क्षतीपुर्ती बंधपत्र अर्जदाराने दाखल केल्यानंतर मुद्देमाल परत करण्याबाबतचे पत्र पाठविणेत यावे.

६. प्रस्तुत मुद्देमाल वाहनाबाबतच्या अटी व शर्तीबाबत संबंधीत आर.टी.ओ. यांना पत्राने कळवावे.

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.05.28 18:02:47 +0530

दिनांक – २८/०५/२०२६.

**(श्रीमती ए. एस. गुंजवटे)**
प्रथवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्रं.१), निलंगा.